# कृतिशील गतिमानतेने एसटी महामंडळाच्या भविष्याकडे मार्गक्रमण करुया : दिवाकर रावते

## एसटीचा ६८वा वर्धापन दिन वाढीव उत्पन्न दिन' म्हणून राज्यभर साजरा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासमोरील भविष्यातील आव्हाने स्वीकारताना एसटीत परिवर्तन घडविण्यासाठी महामंडळातील सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कृतीशील गतिमानता दाखविण्याची गरज आहे. या कृतीशील गतिमानतेने एसटी महामंडळाच्या पुढील वाटचालीकडे मार्गक्रमण करुया, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी बुधवारी येथे केले.

मुंबई सेंट्रल येथील एस.टी. महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय परिसरात श्री. रावते यांच्या उपस्थितीत एस.टी.चा ६८वा वर्धापन दिन, वाढीव उत्पन्न दिन' म्हणून साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या सोहळ्यास एस.टी. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल, वाहतूक महाव्यवस्थापक वि.व.रत्नपारखी, मुख्य लेखाधिकारी एकनाथ मोरे, भांडार महाव्यवस्थापक रा. रा. पाटील, यंत्र अभियांत्रिकी महाव्यवस्थापक व.बा. गायधनी, महाव्यवस्थापक सुर्यकांत अंबाडेकर, एस.टी. महामंडळातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवाशांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने एस.टी. बसनेच प्रवास करावा यासाठी संपूर्ण राज्यभर अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यात येत असल्याचे सांगून एस.टी. बसमध्ये विना तिकीट प्रवास करणाऱ्यांवर दंड आकारण्यात येतो. परंतु काही ठिकाणी असे प्रकार वारंवार घडतात. अशा वेळी विना तिकीट प्रवास करताना प्रवासी आढळल्यास त्या प्रवाशाला शेवटच्या स्थानकापर्यंत बसमध्येच थांबवून ठेवण्याची कल्पना राबविण्याचा महामंडळाचा विचार सुरु असल्याचेही श्री.रावते यांनी सांगितले.

एसटी महामंडळाला आज ६८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ६८व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा देत १०० वर्षानंतरही येणाऱ्या पिढीला एस.टी. महामंडळाची बस ही आपली बस' वाटली पाहिजे, असा संदेश सामान्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. हा ६८वा वर्धापन दिन वाढीव उत्पन्न दिन म्हणून साजरा करत असताना बस चालक, वाहकांना प्रोत्साहित करण्यासाठी वाढीव उत्पन्नावरील प्रत्येकी १० टक्के रक्कम दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




एसटी महामंडळात जवळजवळ ३८ वर्षांपासून अविरतपणे काम करणाऱ्या राज्यभरातील ६८ सेवा ज्येष्ठ कामगारांचा या वर्धापन दिनी सत्कार करण्यात आला असून मुंबई सेंट्रल या मध्यवर्ती आगारातील १२ कामगारांचा ५ हजार रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देऊन श्री.रावते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यात श्रीमती स्नेहलता राजाध्यक्ष, दिलीप सुर्वे, श्रीमती अक्षदा दरेकर, एल. व्ही. नार्वेकर, आर. ए. पावटे, सुरेश भुजबळ, शशिकांत भोसले, सीताराम परब, दिलीप विघ्ने, श्रीमती रेखा नारकर, अशोक शिंदे आणि दिलीप लाड या सत्कारमुर्तींचा समावेश होता. या कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना राज्यभरातील ६८ सत्कारमूर्तींनी एसटी महामंडळातील आपल्या चांगल्या अनुभवांचे लेखन करुन त्याचे ग्रंथ तयार करावेत. त्यामुळे येणाऱ्या पिढीला ते मार्गदर्शक ठरेल, असेही श्री.रावते यांनी यावेळी सांगितले.

## नरसिंहरावांनी केली नेताजींची भारतरत्नसाठी शिफारस

**नवी दिल्ली :** भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मरणोत्तर भारतातील सर्वोच्च नागरी भारतरत्न पुरस्कार देण्याची शिफारस केल्याचे गोपनीय फायलींमधून समोर आले आहे.

सुभाषचंद्र बोस यांच्याबाबतच्या काही गोपनीय फाईलींचा खुलासा करण्यात आला आहे. या फायलींमधून ही माहिती उघडकीस आली आहे. यामुळे तत्कालीन सरकारला नेताजींच्या मृत्यूबद्दल कल्पना होती हे स्पष्ट झाले आहे. १० ऑक्टोबर १९९१ ही तारिख असलेल्या पत्रात नरसिंहराव यांनी राष्ट्रपती आर. व्यंकटरामण यांना पत्र लिहिले होते. या पत्रात त्यांनी लिहिले होते की, नेताजी सुभाषचंद्र बोस यांना भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या अमुल्य योगदानासाठी व लोकसेवेसाठी भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणजेच भारतरत्न देण्यात यावा अशी मी शिफारस करतो.

नरसिंहराव यांनी पुन्हा १९ जानेवारी १९९२ रोजी लिहलेल्या पत्रात म्हटले होते की, हे पुरस्कार नेताजींना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजेच २३ जानेवारीला एका विशेष औपचारिक समारंभात बहाल करण्यात यावा. पुढे त्यांच्या परिवाराने हा सन्मान स्वीकारण्यास नकार दिला.

सांस्कृतिक खात्याचे सचीव एन. के सिन्हा यांनी नेताजींशी संबंधित २५ गोपनीय फाईलींचे शुक्रवारी ऑनलाइन प्रकाशन केले. यामध्ये १९६८ ते २००८ या काळातील प्रधानमंत्री कार्यालय, केंद्रीय गृह मंत्रालय व परराष्ट्र मंत्रालयाच्या फाईली आहेत. या वर्षी २३ जानेवारीला नेताजींच्या ११९ व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेताजींशी संबंधित पहिल्या १०० फायलींचे ऑनलाईन उपलब्ध करुन दिल्या होत्या.

# तुळशी वृंदावन व वन उद्यानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**पंढरपूर :** येथील यमाई तलाव परिसरात तुळशी वृंदावन व वन उद्यान विकसित करण्यात येत आहे. तुळशी वृंदावन व वनउद्यानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळशी वृक्षाची लागवड करुन या प्रकल्पाचा शुभारंभ केला.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये नवीन पूल विष्णूपद बंधारा, जल शुद्धीकरण केंद्र, अग्निशामक दल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान व वाहनतळ, अधिकारी-कर्मचारी निवासस्थान व रस्त्यांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, सहकार मंत्री चंद्रकात पाटील, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, पालकमंत्री विजय देशमुख, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, आमदार भारत भालके, आमदार प्रशांत परिचारक, विभागीय आयुक्त एस. चोक्कलिंगम्, जिल्हाधिकारी रणजित कुमार, नगराध्यक्षा साधना भोसले आदी उपस्थित होते.



तोरणा गडावर यशस्वीरित्या चढाई केलेले प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंदराव जाधव, पुणे जिल्हाप्रमुख ओंकार मुळे, ठाणेचे जिल्हाप्रमुख कुलदीप जाधव, प्रणव पोणकर, ज्ञानेश्वर रसाळ आदी दुर्गरक्षक वीर.

# दुर्गरक्षक प्रतिष्ठानच्या वीरांनी केली तोरणा गडावर चढाई

**पुणे :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दुर्गरक्षक प्रतिष्ठानच्या वीरांनी तोरणा गडावर यशस्वीरित्या चढाई केली. तसेच गडावर स्वच्छता मोहिम राबविली.

या मोहिमेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंदराव जाधव, पुणे जिल्हाप्रमुख ओंकार मुळे, ठाणेचे जिल्हाप्रमुख कुलदीप जाधव, प्रणव पोणकर, ज्ञानेश्वर रसाळ आदी सहभागी झाले होते.

प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी तोरणा गडावरील सर्वात अवघड असलेली झुंझार माची दुरुस्त केली. तसेच पाण्याच्या टाक्या, कचरा गोळा करुन गड चकाचक केला. त्याचबरोबर महत्वाच्या ठिकाणी नामफलकही लावण्यात आले.

# पीक विम्याच्या अनुदानातून कर्ज कपात केल्यास बँकांवर कारवाई

## जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह यांचा आदेश

**यवतमाळ : प्रतिनिधी**

शासनाच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व गावांची खरीप हंगाम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांचे कर्ज पुनर्गठन करण्यात येत आहे. पुनर्गठन करताना शेतकऱ्यांवर कोणताही बोजा पडू नये, तसेच पीक विम्याच्या अनुदानातून कर्ज वसुली केल्यास बँकांवर कारवाई करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिले. ते जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित राष्ट्रीयकृत बँकांकडून पीक कर्ज वाटपाच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी जिल्हा उपनिबंधक अर्चना माळवे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गायकवाड, राष्ट्रीयकृत बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.सिंह यावेळी म्हणाले, पैसेवारी कमी आल्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी २०१५-१६ मध्ये खरीप हंगामासाठी पीक कर्ज घेतले आहे, त्यांना पुनर्गठनाचा लाभ देण्यात येणार आहे. पुनर्गठन करताना शेतकऱ्यांवर स्टॅम्प ड्युटी किंवा इतर खर्च पडू नये, याची बँकांनी काळजी घ्यावी. हवामान आधारीत विमा योजनेतून मिळणाऱ्या रकमेतून बँकांना कर्ज वसुली करता येते, मात्र येत्या आठ दिवसात पीक विमा अनुदानाच्या रकमेतून बँकांना वसुली करता येणार नाही. हा पैसा शेतकऱ्यांना पेरणी पूर्व किंवा बियाणे खरेदीसाठी उपयोगात आणता येणार आहे. साधारणत: जिल्ह्यात ११७ कोटी रुपयांची मदत या माध्यमातून मिळणार आहे. एकप्रकारे ही शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मदतच होणार आहे. त्यामुळे बँकांनी हे अनुदान कर्जातून कपात करू नये, अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास बँकांवर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना त्यांनी बँकांच्या प्रतिनिधींना यावेळी केल्या. जिल्ह्यात एकूण चार लाख १७ हजार शेतकरी आहेत. यापैकी ६८ टक्के शेतकरी पुन्हा कर्ज घेण्यास पात्र आहेत. प्रत्येक शेतकऱ्याला कर्ज देण्याचे धोरण शासनाने आखले आहे. त्यामुळे जिल्ह्यात ४० हजार नव्या शेतकऱ्यांना कर्ज दिल्यास सुमारे ८० टक्के शेतकरी कर्ज मिळण्यास मदत होईल. कर्ज वाटपास बँकांना अद्यापही बराच कालावधी हाती आहे, त्यामुळे हे लक्ष्य पूर्ण होऊ शकेल. त्यामुळे पीक कर्ज वाटपात जिल्ह्याचे एक चांगले उदाहरण निर्माण होऊ शकेल.

# हिंजवडीतील तलाठी कार्यालय मारूंजी गावात सुरु करावे

## अंकुश जगताप यांची तहसीलदारांकडे मागणी

**हिंजवडी : प्रतिनिधी**

हिंजवडी येथील नियमबाह्य व गैरसोईचे तलाठी कार्यालय बंद करून ते सजा असलेल्या मारुंजी गावातच सुरू करावे, अशी मागणी मारुंजीचे रहिवासी अंकुश जगताप यांनी मुळशीचे तहसीलदार प्रशांत ढगे यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात जगताप यांनी तहसीलदार ढगे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, सुरुवातीपासून मारुंजी सजा असलेले तलाठी कार्यालय हिंजवडीत सुरू करणे हा ग्रामस्थांवर अन्याय आहे. हिंजवडीत एमआडीसीने सर्व सरकारी जागा घेतल्याने आता मूलभूत सुविधांसाठी जागा नाही. कामानिमित्त जाणाऱ्या शेतकऱ्यांना वाहतूक कोंडी, प्रसंगी अपघातांना सामोरे जावे लागत आहे.

हिंजवडी येथील तलाठी कार्यालय तोकड्या जागेत सुरू आहे. याउलट मुबलक जागा देण्याचा ठराव मध्यवर्ती असलेल्या मारुंजी ग्रामसभेने केला आहे. म्हणून तलाठी कार्यालयाचा कारभार मारुंजी गावातूनच झाला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

'न्यायस्वातंत्र्य समता' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे ४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२, महात्मा फुले वसाहत कोंढवा, खुर्द, कमेला, पुणे ४११०४८ येथून प्रकाशित केले.

या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वादविवाद पुणे न्यायकक्षेत, अन्यत्र कोठेही नाही.